**Publication:** Loksatta
**Date:** 08.09.2015
**Page:**03
**Headline:**Bhagat and Parmar win the Interschool Quiz competition

# आंतरशालेय प्रश्नमंजूषेत भगत व परमार विजयी

प्रतिनिधी, नागपूर




टाटा कन्सल्टन्सी सर्व्हिसेसतर्फे घेण्यात आलेल्या आंतरशालेय प्रश्नमंजूषेत एस.एफ.एस कनिष्ठ महाविद्यालयाचे राहुल भगत आणि उदित परमार विजयी झाले. वसंतराव देशपांडे सभागृहात झालेल्या या स्पर्धेत शहरातील विविध शाळेतील विद्यार्थी सहभागी झाले होते. आठवी ते बारावीपर्यंत विद्यार्थ्यांसाठी ही स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. पाच फेऱ्यांमध्ये ही स्पर्धा घेण्यात आली असून त्यात एसएफएस महाविद्यालयाची चमू विजयी झाली. वर्धमाननगरच्या सेंटर पॉईंट स्कूलच्या अर्चित वेणूगोपाल आणि संचित खेडकर या विद्यार्थ्यांना उपविजेतेपद मिळाले.

प्राथमिक फेरीनंतर अंतिम फेरीत प्रवेश केलेल्या सहा स्पर्धकांना उत्तेजनार्थ पारितोषिके देण्यात आली. भारतामध्ये १५ शहरात ही प्रश्नमंजूषा घेतली असून त्यातील अंतिम विजेत्यांची स्पर्धा मुंबईमध्ये होणार आहे. यावेळी टीटीएसचे आलोक कुमार यांच्या हस्ते विजेत्या शाळांना सन्मानित करण्यात आले.